पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवीमुंबई

दिनांक १०.०६.२०२१

**एनआरआय सागरी पोलीस ठाणे हद्दीमध्ये गुटख्याचा विक्रीसाठी साठा करून ठेवलेल्या इसमाविरुद्ध गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई**

.......................................................................................................

दि. २०/०५/२०२१ रोजी पोहवा/८४९ मोहंमद इकबाल बशीर शेख यांना त्यांचे गुप्तबातमीदारांकडून मिळालेल्या बातमीची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज छापरीया यांना दिली असता त्यांनी तात्काळ मा. अपर पोलीस आयुक्त सो. गुन्हे, नवी मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे शाखा व सहा. पोलीस आयुक्त सो. गुन्हे शाखा यांना सांगितली असता, त्यांनी सदरची बाब गंभीर पणे घेवुन मार्गदर्शनपर सुचना देवुन वपोनि जयराज छापरीया यांना कारवाई करण्यास सांगितले त्या नुसार वपोनि जयराज छापरीया, सपोनि अश्विनी कुसुरकर, सहा. पोलीस उपनिरीक्षक इनामदार, पोहवा/१२०२ पिरजादे, पोहवा/८४९ शेख, पोना/२८७९ अहीरे, पोशि/३५८० सांगोलकर असे मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी एनआरआय सागरी पोलीस ठाणेच्या हद्दीत पोद्दार स्कुलजवळ, गणेश जयराम भोईर यांच्याचाळीत, खोली नंबर २ समोर नवी मुंबई येथे सापळा लावून छापा टाकला असता सदर इसम नामे अशोक कुमार सुरजभान चौहान वय ४० धंदा-सफाई कामगार रा. घर नंबर ४५, खोली नंबर २, गणेश जयराम भोईर यांची चाळ, पोद्दार स्कुलजवळ, करावे गाव, सेक्टर ३६, सिवुड, नवी मुंबई मुळ रा. गाव गढवाल, पोस्ट बुटानाता. गोहाना, जि. सोनीपत, राज्य हरीयाणा याच्या ताबे कब्जात व त्याच्या राहत्या खोलीत **एकूण ०८ किलो ५०० ग्रॅम वजनाचा एकुण अंदाजे १,५३,०००/- रू. किंमतीचा 'गांजा' हा अंमली पदार्थ व इतर असा एकूण १,६६,२००/- रु किमतीचा मुद्देमाल** मिळुन आला. त्यास अटक करून एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

.....................................................